आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०४ जानेवारी २०२६

ठळक बातम्या

1. महानगरपालिकांच्या निवडणुकीत १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात / चंद्रपुरातील रोड-शो द्वारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रचाराला सुरुवात.
2. उमेदवारांची बिनविरोध निवडणुक झालेल्या महापालिका क्षेत्रात नव्याने निवडणूक घेण्याची उद्धव ठाकरे यांची मागणी.
3. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे शतकपूर्ती मराठी साहित्य संमेलन पुण्यात होणार.
4. विदर्भातील सर्व जिल्ह्यात किमान तापमानात लक्षणीय वाढ.

महानगरपालिका उमेदवार

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी, अंतिम उमेदवार यादी काल जाहीर झाली. त्यानुसार राज्यातल्या महानगरपालिकांच्या २ हजार ८६९ प्रभागांमधून १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी ३८ प्रभागांतील १५१ जागांसाठी ९९२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होईल.

प्रचारसभा- मुख्यमंत्री

चंद्रपूर शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या प्रचाराला आज मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. फडणवीसांनी चंद्रपुरात रोड शो करत विदर्भातील प्रचाराला प्रारंभ केला. प्रथम चंद्रपूरच्या देवी महाकालीमातेचे दर्शन घेत, अंचलेश्वर गेट परिसरातून या रोड शो ची सुरुवात झाली. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार किशोर जोरगेवार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते हंसराज अहिर हे देखील यावेळी उपस्थित होते. विजय संकल्प यात्रेच्या समारोपप्रसंगी शहरातील ऐतिहासिक जटपूरा गेट येथे संबोधन करताना गेल्या काही वर्षात महानगरपालिकेसाठी विविध विकास निधी आणून शहराचा विकास साधल्याचं फडणवीस म्हणाले-

चंद्रपूर नंतर मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी अमरावतीमध्ये देखील प्रचार दौरा केला. यामध्ये त्यांनी अमरावती शहरातील पंचवटी चौकातून रोड शो करत मतदारांना मतदान करण्याचं आव्हान केल. पंचवटी चौकातून निघालेला हा रोड शो गाडगे नगर, शेगाव नाका, मार्गे जात शहरातील मुख्य चौकातून जात साईनगर इथं साप्त झाला. यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत खुल्या जीपमध्ये माजी खासदार नवनीत राणा, भाजपाचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, विधान परिषदेचे माजी सदस्य प्रवीण पोटे,**ॲ**ड. प्रशांत देशपांडे सोबत होते. त्यानंतर अकोला येथे देखील फडणवीसांची प्रचार सभा झाली. उद्या मराठवाड्यातील जालना, छत्रपती संभाजीनगर,परभणी आणि नांदेड येथे मुख्यमंत्र्यांची प्रचार सभा आयोजित करण्यात आल्याचं मंत्री बावनकुळे यांनी सांगितलं आहे.

<u>ठाकरे पत्रकार परिषद/ बावनकुळे</u>

राज्यातील ज्या महापालिका क्षेत्रात बिनविरोध निवडणुका झाल्या तेथील निवडणूक प्रक्रिया रद्द करून नव्याने निवडणूक घेण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. पश्चिम बंगालमधील बिनविरोध निवडींना भाजपने न्यायालयात आव्हान दिलं होतं आता महाराष्ट्रातील बिनविरोध निवडीबाबत भाजपची भूमिका काय आहे, असा प्रश्न मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला. शिवसेना भवन इथं दोन्ही नेत्यांनी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी संयुक्त जाहीरनामा प्रकाशित केला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना बिनविरोध निवडींवर प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, ठाकरेंच्या जाहीरनाम्याला जनता विचारणार नाही. महापालिकेची निवडणूक भावनांवर नव्हे तर विकासावर आधारित असणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक भाषणात विकासावरच चर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जनता विकसित महाराष्ट्रासाठी भाजप–महायुतीला मतदान करेल असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. आज नागपुरात विविध विषयांवर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

विकसित भारत

जागतिक स्तरावर भारताच्या उदयाचा निर्णायक अध्याय म्हणून २०२५ कडे पाहिलं जाईल. आर्थिक अनिश्चितता, भूराजकीय उलथापालथ आणि सत्तेच्या बदलत्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये स्थैर्य देणारं व्यक्तिमत्व म्हणून उदयाला आले. याविषयी आता सविस्तर ऐकुया...

*जागतिक व्यापारातल्या अस्थिरतेसाठी ओळखलं जाणारं २०२५ हे वर्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची कसोटी पाहणारं होतं. ट्रम्प यांनी अतिरिक्त शुल्क लादल्यानंतरही प्रधानमंत्री मोदी आपल्या राष्ट्रप्रथम या भूमिकेवर ठाम राहिले आणि व्यापार करारांसाठी आणलेला दबाव भारताने धुडकावून दिला. त्याखेरीज भारताने धोरणात्मक व्यापारी करार करून आपलं भविष्य सुरक्षित केलं. भारत-यूके आणि भारत ओमान या दरम्यान झालेल्या करारांमुळे भारतीय वस्तुंना पश्चिम आणि आखाती देशांमध्ये शुल्कमुक्त प्रवेश झाला. न्यूझीलंडबरोबर झालेल्या करारामुळे भारताची करमुक्त निर्यात सुनिश्चित झाली. जागतिक अंदाजांना खोटं ठरवत भारतीय अर्थव्यवस्थेत सकल राष्ट्रीय उत्पादनाने यंदा ८ पूर्णांक २ दशांश टक्के इतकी वाढ नोंदवली.*

व्हेनेझुएला

व्हेनेझुएला मधल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांवर चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदने उद्या, सोमवारी आपत्कालीन बैठक बोलावली आहे. सुरक्षा परिषदेचा अ-स्थायी सदस्य असलेल्या कोलंबियाच्या विनंतीवरून ही बैठक बोलावली असून, त्याला चीन आणि रशिया, या स्थायी सदस्य देशांनी पाठिंबा दर्शवला आहे. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना काल अमेरिकेनं अटक केली असून, त्यानंतर व्हेनेझुएलामध्ये केलेल्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर, हा निर्णय घेतल्याचं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. अमेरिकेच्या या कारवाईबद्दल संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी चिंता व्यक्त केली असून, हे आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान व्हेनेझुएला मधल्या सध्याच्या घडामोडींबद्दल भारतानं तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या संपूर्ण परिस्थितीवर आपण लक्ष ठेवत असून, व्हेनेझुएलाच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपलं पूर्ण सहकार्य असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

साहित्य संमेलन

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या साताऱ्यातील हे संमेलन सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. आगामी 100 व्या साहित्य संमेलनास सरकार सर्वपरी मदत करेल. मराठीचे वैभव जपणे सर्वांचे कर्तव्य आहे असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा येथील 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोपीय भाषणात केलं. राज्यात मराठीचा सन्मान होईल. हिंदी सक्तीचा निर्णय राज्यात होणार नाही असं आश्वासन देखील त्यांनी दिल. यावेळी संमेलन अध्यक्ष विश्वास पाटील, स्वागताध्यक्ष बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले भाषा मंत्री उदय सामंत, जेष्ठ साहित्यिक रघुवीर चौधरी, पालकमंत्री शंभूराज देसाई, मसापचे अध्यक्ष प्रा मिलिंद जोशी, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. साहीत्य चळवळ आणि संस्थांत राजकीय हस्तक्षेप होणार नाही, अस देखील एकनाथ शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केलं. ग्रामीण भागातील साहित्यिकांचे साहित्य इतर भाषेत अनुवादित करण्यासाठी पुढील वर्षांपासून स्व यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने भाषा अनुवादीत करण्यासाठी समिती कार्यान्वित करण्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी संमेलन समारोप सोहळयात केली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे 100 वे शतकपूर्ती मराठी साहित्य संमेलन पुण्यात होणार असून त्याची घोषणा समारोपाच्या सोहळयात मसापचे अध्यक्ष प्रा मिलिंद जोशी यांनी केली.

शिवराजसिंग चौहान

विकसित भारत जी रामजी योजना,पू र्वीच्या मनरेगा योजनेच्या तुलनेत अधिक पारदर्शक आणि कल्याणकारी असल्याचं, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज सांगितलं. या योजनेबद्दल काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, ग्रामीण भागात जादा रोजगार उपलब्ध होण्यासाठी, व्हि.बी- जी राम जी कायदा अकुशल कामगारांना लाभदायक ठरेल, अशी प्रतिक्रिया सुराळाचे सरपंच तथा वाशीम सरपंच संघटनेचे अध्यक्ष पवन मोतीराम राऊत यांनी आकाशवाणीशी बोलताना दिली......

*शासनाची विकसित भारत उपजीविका, रोजगार हमी मिशन यामध्ये ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने केंद्र सरकारने नवीन पद्धतीने चालू केले आहे. यामध्ये पहिले 90 दिवसाचा कार्यकाळ होता. आता 125 दिवसांचा एका मजुराला कार्यकाळ घेण्यात आला. यामध्ये वैयक्तिक लाभ असेल सार्वजनिक लाभ बसेल जसे की, घरकुलाच्या मजुऱ्या असतील त्यानंतर वैयक्तिक शोषखड्डे असतील जे जे व्यक्ती म्हणजे*

*शेतामध्ये विहिरीचे पुनर्भरण असेल अशा काही योजना आहेत, या 'जी राम जी' या योजनांमध्ये घेण्यात आल्या.*

हवामान

हवामान-आज भंडारा जिल्ह्यात १० अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. विदर्भात सर्वत्र किमान तापमानात लक्षणीय वाढ होत आहे. मागील काही दिवसांत सातत्यानं निचांकी तापमानाची नोंद झालेल्याय गोंदिया जिल्ह्यात, आज १२ पूर्णांक २ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. वाशीम इथे १२.८, अकोला १६.६, बुलढाणा १६, यवतमाळ १६.२, नागपूर १५.२, वर्धा १५.६, गडचिरोली १४ आणि चंद्रपूर इथे १८अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. दरम्यान विदर्भात कमाल तापमान स्थिर आहे.

*****